RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. १ मे 2026**

1960- आंतरराष्ट्रीय कामगार दिन/ महाराष्ट्र दिन.



1932- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1 भिन्न मतपत्रिका लौथीयन कमिटी पुढे ठेवली.

1953- राज्यसभेत बाबासाहेबांचे महत्वपूर्ण भाषण.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

शुक्रवार, १ मे २०२६ | वर्ष : ६ | अंक : १२२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Friday, 1 May 2026 | Year : 6 | Issue : 122 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्त्वाच्या बातम्या

### वादळ येत आहे, कुणीही रोखू शकणार नाही! : डोनाल्ड ट्रम्प

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराणमधील संघर्ष पुन्हा एकदा पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल'या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक गूढ आणि तितकीच इशारा देणारी पोस्ट शेअर केली आहे. 'एक मोठे वादळ येत आहे आणि त्याला आता कोणीही रोखू शकणार नाही,' असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, अमेरिका इराणवर मोठा लष्करी हल्ला करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष 28 फेब्रुवारी 2026 रोजी सुरू झाला होता. त्यावेळी अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या अणुकेंद्रांवर आणि लष्करी तळांवर भीषण हवाई हल्ले केले होते. प्रत्युत्तरादाखल इराणनेही अमेरिकन तळांना लक्ष्य केले. सुमारे 39 दिवस चाललेल्या या भीषण युद्धानंतर 8 एप्रिल रोजी पाकिस्तानच्या मध्यस्थीने तात्पुरता सीजफायर लागू करण्यात आला. मात्र, गेल्या काही दिवसांपासून हा शांततेचा करार धोक्यात आल्याचे दिसत आहे.

### महायुती-महाविकास आघाडीचे ठरले

**मुंबई :** विधान परिषदेच्या 9 जागांसाठी येत्या 12 मे रोजी मतदान होणार आहे. आमदारांच्या संख्याबळावरून विधान परिषदेच्या 9 जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत महायुतीला 8 तर महाविकास आघाडीला केवळ 1 जागा मिळणार आहे. यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्षांनी आपापले उमेदवार जाहीर केले आहेत. विधान परिषदेच्या निवडणुकीत कोणत्या पक्षांकडून कोण उमेदवार असतील, याची यादी आता समोर आली आहे. राज्यात होत असलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीच्या उमेदवारीवरून विरोधी पक्षातील महाविकास आघाडीमध्ये सुरू असलेला तिढा अखेर सुटला आहे. विधान परिषद निवडणुकीतून काँग्रेसने माघार घेतली असून, आपला उमेदवार उतरवण्याचा हट्ट सोडला आहे. उद्धव ठाकरेंचा निर्णय हा मविआचाच निर्णय आहे, असे सांगत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अंबादास दानवे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. दुसरीकडे बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करताच विधान परिषदेची उमेदवारी त्यांना मिळाली. भाजपा, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी आधीच उमेदवार जाहीर केले. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी संपूर्ण उमेदवारांची यादी.

## सुटीची सूचना

दि. १ मे २०२६ रोजी कामगारदिनानिमित्त मुद्रणालयाला सुटी असल्यामुळे दि. २ मे २०२६ रोजीचा बहुजन सौरभचा अंक प्रकाशित होणार नाही. नियमित अंक दि. ३ मे २०२६ रोजी वाचकांना प्राप्त होईल. याची वाचक, जाहिरातदार व वितरकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# मातृभूमीच्या लोकांचे सरकार स्थापन करत आहोत ...



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये विक्रमी मतदान झाल्यानंतर, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी 'आई, माती आणि माणूस' यांचे सरकार पुन्हा एकदा स्थापन होत असल्याचा धाडसी दावा केला. आपला पक्ष 226 जागांचा टप्पा ओलांडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना स्ट्रॉंग रूमचे रात्रंदिवस रक्षण करण्याचे आवाहनही केले. इन्स्टाग्रामवर पोस्ट केलेल्या एका व्हिडिओमध्ये, त्यांनी जनतेला संबोधित केले, आभार व्यक्त केले आणि निवडणूक प्रक्रियेदरम्यान घडलेल्या घटनांबद्दल गंभीर आरोप केले. मुख्यमंत्री ममता म्हणाल्या, *'मातृभूमी, भूमी आणि बंगालच्या जनतेचे मनःपूर्वक आभार. तुम्ही सर्वजण सुखरूप आणि निरोगी राहा. एवढ्या कडक उन्हात आणि प्रचंड दडपशाही सहन करूनही तुम्ही ज्या प्रकारे मतदान केले, त्याबद्दल मी तुम्हा सर्वांची आभारी आहे. मी माझ्या त्या जवानांचेही आभार मानते, ज्यांनी केवळ केंद्रीय दलांकडूनच नव्हे, तर स्थानिक दलांकडूनही सर्व प्रकारचे अत्याचार सहन करून आपले कर्तव्य बजावणे सुरूच ठेवले.'*



'मतमोजणीच्या दिवशी, माझी पत्रकार परिषद होईपर्यंत कार्यकर्त्यांनी मतमोजणीच्या टेबलापाशीच थांबावे,' असे मुख्यमंत्री ममता म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या, 'माझी पत्रकार परिषद होईपर्यंत कोणीही मतमोजणीचे ठिकाण सोडू नये. मतमोजणीनंतर ईव्हीएमचा डेटा संगणकात अचूकपणे नोंदवला जाईल, याची खात्री करणेही महत्त्वाचे आहे. तसेच, तृणमूल काँग्रेसच्या जागा भाजपच्या जागांमध्ये जोडल्या जाण्याची शक्यता आहे.' असे त्या म्हणाल्या. प्रधानमंत्री आणि गृहमंत्री यांच्यापासून ते भाजपशासित 19 राज्यांच्या नेत्यांपर्यंत, भारत सरकारच्या संपूर्ण यंत्रणेने बंगालच्या जनतेला आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मी जाहीर करते की मतपेटीतील मते जप्त करण्यात आली आहेत. मी पूर्ण खात्रीने सांगत आहे की टीव्हीवर जे काही दाखवले जात आहे, तो सगळा पैशांचा खेळ आहे. मी स्पष्टपणे सांगत आहे की 2026 मध्ये आम्ही 226 जागांचा टप्पा ओलांडू. जनतेने ज्या प्रकारे मतदान केले आहे, त्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. भाजपने हे (एक्झिट पोल) प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून घेतले. ते चमकण्यासाठी ईडी आणि सीबीआयचा वापर करतात.' ममता म्हणाल्या की, अमित शाह यांच्या थेट निर्देशांनुसार, पश्चिम बंगाल निवडणुकीदरम्यान केंद्रीय दल भाजपचे एजंट म्हणून काम करत आहेत.

> पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर आलेल्या बहुतांश एक्झिट पोलमध्ये भाजप आघाडीवर तर सत्ताधारी तृणमूल पिछाडीवर दिसत आहे. अशा परिस्थितीत, जर पश्चिम बंगालमध्ये त्रिशंकू विधानसभा निर्माण झाली तर काँग्रेस तृणमूल काँग्रेसला पाठिंबा देणार का? असे विचारले असता, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी स्पष्ट शब्दांत उत्र दिले. ऊबघूया, आत्ताच काहीही बोलणे योग्य ठरणार नाही. चित्र स्पष्ट होण्यासाठी आपण दोन-तीन दिवस थांबूया.
>
> - मल्लिकार्जुन खर्गे

> मला दोन दिवसांपासून झोप लागलेली नाही. सर्व डावपेच वापरूनही भाजपला लोकांचे हक्क हिसकावून घेता आलेले नाहीत. म्हणूनच त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून याचा (एक्झिट पोलचा) वापर केला आहे. जर सत्य समोर आले, तर शेअर बाजार कोसळेल. शेअर बाजाराला दिलासा देण्यासाठी हे केले गेले आहे. हे मला विश्वसनीय सूत्रांकडून समजले आहे. की, 2016 आणि 2021 मध्ये एक्झिट पोल चुकीचे ठरले आहेत. एक्झिट पोलमध्ये भाजपच्या बाजूने निकाल दाखवण्यात आले आहेत. हा एकतर्फी दृष्टिकोन आहे. मी माझ्या कार्यकर्त्यांना आजपासून मतमोजणीचे रक्षण करण्यास सांगेन. गरज पडल्यास मी माझ्या भागाचे रक्षणही करेन. मा-माती-माणूस यांचे सरकार पुन्हा स्थापन होईल.
>
> - मुख्यमंत्री ममता बॅनर्जी

# लोकशाही हक्कही चिरडले गेले आहेत : राहुल गांधी

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लडाख या केंद्रशासित प्रदेशातील परिस्थितीवरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रतिक्रिया देताना त्यांनी दावा केला की, लडाखच्या सुंदर परिसराचे 'पोलीस राज्या'त रूपांतर झाले आहे, जिथे स्थानिक लोकांचा आवाज दाबला जात आहे. आपल्या पोस्टमध्ये, राहुल गांधी यांनी लडाखमधील तरुणांशी झालेल्या संभाषणाचा हवाला देत लिहिले आहे की, तिथे लोकशाही हक्कांचे उल्लंघन होत आहे. केंद्र सरकारवर निशाणा साधत ते म्हणाले, 'लडाखची भूमी आणि नाजूक पर्यावरण मोदीजींच्या अब्जाधीश मित्रांच्या हाती सोपवले जात आहे.' त्यांनी असा आरोप केला की, विकासाच्या नावाखाली स्थानिक परिसंस्थेशी छेडछाड केली जात आहे.



विरोधी पक्षनेत्यांनी स्पष्ट केले की, लडाखचे नागरिक विकासाला विरोध करत नाहीत. त्यांनी लिहिले की, तेथील लोकांना रोजगार आणि नवीन उद्योग हवे आहेत, पण त्यांना असा विकास हवा आहे, ज्याचा थेट फायदा स्थानिक लोकांना होईल, बाहेरच्या मोठ्या भांडवलदारांना नाही. राहुल गांधींच्या मते, तेथील लोकांना त्यांच्या भविष्यावर आणि संसाधनांवर नियंत्रण हवे आहे, ज्याकडे सध्या दुर्लक्ष केले जात आहे. लडाखमधील वास्तविक परिस्थिती समजून घेण्याचे आवाहन करताइना, राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दौऱ्याचाही उल्लेख केला. त्यांनी आशा व्यक्त केली की, आपल्या दौऱ्यादरम्यान गृहमंत्री लडाखमधील कठोर वास्तव आणि स्थानिक तरुणांच्या वेदना समजून घेण्याचा प्रयत्न करतील. हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा लडाखमध्ये राज्याचा दर्जा आणि सहाव्या अनुसूचीसाठी दीर्घकाळ चाललेले आंदोलन सुरू आहे

# मतमोजणी केंद्रांमध्ये प्रवेशासाठी क्यूआर कोड ...



**कोलकाता :** मतमोजणी केंद्रांची सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी निवडणूक आयोगाने एक मोठे पाऊल उचलले आहे. मतमोजणी केंद्रांवर आता क्यूआर कोड आधारित ओळख प्रणाली लागू करण्यात आली आहे. अनधिकृत प्रवेश पूर्णपणे रोखणे हा याचा उद्देश आहे. 4 मे रोजी पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांच्या मतमोजणीदरम्यान या नवीन नियमाची कठोरपणे अंमलबजावणी केली जाईल. चला, हे नियम सविस्तरपणे समजून निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या निकालांची पारदर्शकता आणि सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले आहे. आयोगाने मतमोजणी केंद्रांमध्ये प्रवेशासाठी क्यूआर कोड-आधारित ओळख प्रणाली लागू करण्याची घोषणा केली आहे. ही प्रणाली 4 मे रोजी मतमोजणी सुरू होण्यापूर्वी लागू केली जाईल. याचा उद्देश हा आहे की, कोणतीही अनधिकृत व्यक्ती मतमोजणी केंद्रांमध्ये प्रवेश करू नये आणि संपूर्ण प्रक्रिया सुरक्षित व निष्पक्षपणे पूर्ण व्हावी. ही नवीन प्रणाली अनेक राज्यांमध्ये निवडणुकीचे निकाल जाहीर होताना लागू केली जाईल. आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुदुचेरी येथील विधानसभा निवडणुकांमध्ये. पाच राज्यांमधील सात विधानसभा जागांच्या पोटनिवडणुकांमध्ये. भविष्यातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्येही ती लागू केली जाईल. माध्यमे आणि प्रशासनासाठी काय व्यवस्था केली जाईल? निवडणूक आयोगाने माध्यमे आणि प्रशासनासाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. प्रत्येक मतमोजणी केंद्रावर एक माध्यम केंद्र उभारले जाईल. पूर्वीप्रमाणेच, माध्यमांना केवळ परवानगीपत्राच्या आधारेच प्रवेश दिला जाईल. सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. प्रशिक्षित कर्मचारी तैनात करून कडक देखरेख ठेवली जाईल.

# पवनीत आज बुध्द जयंती सोहळा



**पवनी :** वैशाख पोर्णिमेनिमीत्त 2570 वा बुद्ध जयंती सोहळा व धम्मरॅलीचे भव्य आयोजन पवनी शहरात करण्यात आले आहे. दरम्यान तथागत भगवान गौतम बुद्धाच्या जीवन चरित्रावर मानवतेचा संदेश देणाऱ्या झाकी व बुध्द गीतांवर मुलींचे नृत्य शहरातील चौकाचौकात दाखविण्यात येणार आहेत.

सदर आयोजन बुद्ध जयंती उत्सव समिती तर्फे करण्यात आले असून यामध्ये पवनी शहरातील धम्मनाग बुद्ध विहार मंगळवारी वॉर्ड, बुद्ध प्रार्थना मंडळ शनिवारी वॉर्ड, रमाई बुद्ध विहार बस्तरवारी वॉर्ड, चंद्रमणी बुद्ध विहार तथागत कॉलनी, ज्ञानांकुर बुद्ध विहार शुक्रवारी वॉर्ड, रमाई बुद्ध विहार गौतम नगर वॉर्ड, धम्मप्रभास बुद्ध विहार गौतम वॉर्ड, बुद्ध विहार बुधवारी वॉर्ड यासह पवनीतील जनता मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शुक्रवार 1 मे 2026 ला सायंकाळी ठीक 5.30 वाजता होणाऱ्या बुद्ध जयंती सोहळ्यात व धम्म रॅलीत पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने डॉ. आंबेडकर चौक पवनी येथे उपस्थित राहण्याचे आव्हान आयोजक मनोहर मेश्राम, मनोज शेंडे, अरविंद अंबादे, अरविंद धारगावे, नरेंद्र रामटेके, विनोद टेम्भुरने, मालताई समुद्रेकर, शालिनी मयूर, मंगला धारगावे, प्रमिला टेम्भुरने, वंदना खापर्डे, प्रतिमा सूर्यवंशी यांनी केले आहे.




Sukhdeve family wishes you a very Happy Buddha Jayanti – 2026

This festival, gift yourself a comprehensive Biography of Bhadant Arya Nagarjun Shurei Sasai – **"The Warrior Monk"**

**Contact:**
Harishchandra Sukhdeve phone: **94228 11511 / 7276 979763**









“ द्वेष हा द्वेषाने नाही तर केवळ प्रेमानेच संपवता येतो... ”



# महाकारुणिक बुद्धाचे ‘योद्धा भिक्खू’

भिक्खूंचे कर्तव्य वर्णन करतांना एके प्रसंगी बुद्ध म्हणतात, ‘अनुयायांनो, आपण उत्तम शील, उच्च ध्येय आणि सर्वोच्च प्रज्ञा यासाठी सतत युद्ध करीत असतो. म्हणून आपण योद्धा आहोत.’ पुढे बुद्ध म्हणतात, ‘जेव्हा सत्य संकटात असते तेव्हा संघर्ष करणे टाळू नका, सत्य बोलायला घाबरू नका.’ [संदर्भ : ‘बुद्ध आणि त्यांचा धम्म’ - बुक - 5, भाग - 3(4)] बुद्धाने भिक्खू संघाच्या माध्यमातून एक ‘श्रमण चळवळ’ उभी केली होती. त्यातून बुद्धाला अपेक्षित भिक्खूंचे वर्णन वाचायला मिळते. डॉ. बाबासाहेबांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीनंतर असेच अनेक योद्धा भिक्खू निर्माण झालेत. चिवरधारी परंतु चळवळीतल्या कार्यकर्त्यांसारखे. आंबेडकरवादी बौद्धांनी बुद्धाला अपेक्षित कर्म-कांड मुक्त धम्म अंगिकारला. हे भिक्खू त्या संस्कृतीला पोषक ठरले. परंतु या आधुनिक योद्धा भिक्खूंना आदर्श लाभले ते एक जपानी भिक्खू. ते पुढे भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई या नावाने जगभर प्रसिद्ध झाले. धम्मक्रांतीच्या सुरवातीच्या दशकात, 1968 मध्ये, भंते सुरेई ससाई अचानक नागपुरात दाखल झाले. ते जपानी परंपरेतील तांत्रिक बौद्ध पद्धतीने प्रशिक्षित भिक्खू होते. एका विचित्र प्रसंगातून त्यांनी ‘बोद्धिसत्त्व नागार्जुन’ यांचा प्राचीन अधिवास शोधण्याचा निर्धार केला आणि म्हणून नागपूरला आले. परंतु त्यांना ‘आंबेडकरवादी बौद्ध’ यातले काहीही ऐकून देखील माहीत नव्हते. केवळ बौद्ध भिक्खू म्हणून त्यांना नागपुरात आंबेडकरी बौद्धांमध्ये राहण्याचे स्थान मिळाले. त्यांच्यात स्वतःला मिसळून घेण्यासाठी मात्र त्यांनी कठोर परिश्रम घेतले. ससाई रोज भिक्षाटन करण्याच्या निमित्ताने वस्तीमधून फिरायचे. भाषा कळत नव्हती तरी भावना समजत होत्या. लोकांशी कनेक्शन तयार होत होते, विश्वास बसत होता. ते लोकांमध्ये जीवनाबद्दल ‘होप’ निर्माण करणे होते. ब्राह्मणी-धर्मात जगण्यात ‘होप’ नसणे हे डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतराचे एक प्रमुख कारण होते. हे भंते ससाई यांना जरी माहीत नसेल तरी त्यांच्या व्यक्तिगत जीवनातून ‘होप’/उमेद’ याचे महत्त्व त्यांना पटलेले होते. त्यांना जाणवले की इथले बौद्ध त्यांनी पाहिलेल्या इतर देशातील बौद्धांपेक्षा खूप वेगळे होते. ते सामाजिक विषमतेला कंटाळून ब्राह्मणी-धर्म त्यागलेले धर्मांतरित बौद्ध होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ‘जय भीम’ ही त्यांची ओळख होती. त्यांनी डॉ. बाबासाहेबांचा सखोल अभ्यास केला. ‘जय भीम’ या अस्मिता मंत्राला स्वीकारले. धर्मांतराने लोकांच्या जीवनात खूप काही बदल झाला नव्हता, हे ससाई यांनी अनुभवले. या बौद्धांचे सामूहिक संसाधन असे काही नव्हते. बौद्ध विहार नव्हते. ससाईंनी सर्व प्रथम लोक-सहभागातून बुद्ध विहार निर्माण केले. लोकांना आपले हक्काचे विहार असण्याचे महत्व पटले. आज एकट्या नागपूर शहरात सुमारे पाचशे बुद्ध विहार आहेत. त्यातले अनेक अभ्यासिका आणि शिक्षणाचे केंद्र आहेत. ससाईंच्या कल्पनेतून उभे झालेले पहिलेच विहार जुलै 1978 मध्ये एका मोठ्या चळवळीचे, ‘नामांतर आंदोलना’चे केंद्र बनले. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्याचा सरकारी निर्णय हिंसाचारात बदलला. मराठवाड्यात दलितांची घरे जाळली गेली. महिलांवर अत्याचार झाले. त्याला प्रत्युत्तर म्हणून प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूरमधून नामांतर आंदोलन सुरू केले. त्याची सामग्री ठेवण्यासाठी विहार वापरायचे होते. परंतु विहार म्हणजे शांततेचे स्थान. त्याला आंदोलनाचे केंद्र कसे बनवायचे? वरून ससाई परदेशी. व्हिसा संपलेला. ते द्विधा मनःस्थितीत होते. पण अत्याचाराची तीव्रता समजली. विषय प्रतिष्ठेचा होता. सत्याचा होता. शेवटी ससाई म्हणाले, ‘तुम्हाला जे योग्य वाटते ते करा.’ त्या योद्धा भिक्खूची सत्यासाठी ही पहिली ठाम भूमिका होती. पण आंदोलनात आपण प्रत्यक्ष सहभागी दिसू नये म्हणून ससाई कुशीनगरला निघून गेले, अलिप्त राहण्यासाठी. लवकरच नागपूर दंगलीत पेटले. प्रतिगामी हिंदू सोबतच शीख आणि मुसलमान देखील दलितांच्या विरुद्ध दंगलीत उतरले. इंदोरा भागात हिंसाचार झाला. ससाईंना बातम्या कळत होत्या. कुशीनगरची शांतता त्यांना अस्वस्थ करू लागली होती. ते परत आले. नागपूर तणावाखाली होते. ससाई लोकांना भेटले. नेत्यांच्या बैठकी घेतल्या. संयमाचे आवाहन केले. हळूहळू परिस्थिती शांत झाली. पण पोलिस तपास सुरू होताच. पोलिसांना आंदोलकांची नावे हवी होती. ससाई म्हणाले, ‘मला काही माहीत नाही. अटक करायची असेल तर मला करा.’ सत्यासाठी लढतांना योद्धा भिक्खू इतरांच्या मागे लपत नाही. तो अग्रणी असतो, नेतृत्व करतो हेच ससाईंनी सिद्ध केले. पण ससाईंना अजून एक महत्त्वाची गोष्ट समजली. बौद्ध समुदाय असुरक्षित होता. ते निःशस्त्र, अप्रशिक्षित होते. असंघटित होते. दंगलीत सोपे लक्ष्य होते. त्यांना स्वरक्षणाचे प्रशिक्षण देणे गरजेचे होते. त्यांनी 1977 पासून सुरू केलेला क्रीडा उपक्रम पुढे कराटे प्रशिक्षण केंद्र केला. जपानी मास्टर हिराता ताकेशी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुण/तरुणी तयार झाले. त्यांनी शिस्त शिकली.




आत्मविश्वास मिळवला. हा बदल मानसिक होता. ही भीतीतून सन्मानाकडे वाटचाल होती. एकेकाळी असहाय, बुजरा वाटणारा दलित तरुण आता सन्मानाने उभा राहायला शिकला होता. ससाई नावाच्या या योद्धा भिक्षूने त्यांना शस्त्राने नव्हे, तर धैर्याने सज्ज केले होते. नामांतराचा लढा 16 वर्षे चालला. 14 जानेवारी 1994 रोजी सरकारने मराठवाडा विद्यापीठाचे नाव विस्तार करून ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ’ असे केले गेले. या संघर्षात ससाई योद्धा भिक्खूच्या भूमिकेत सत्याच्या बाजूने खंबीरपणे उभे होते. उत्तर नागपूर भागात वारंवार ज्या हिंदू-मुस्लीम दंगली भडकायच्या त्या मुळात दलित(हिंदू) विरुद्ध मुस्लिम अशाच असायच्या. त्या दंगली कोणत्या शक्ती घडवून आणीत होत्या हे तर कधी कळले नाही, परंतु नामांतराच्या दंगलीनंतर दलित, मुस्लीम आणि शीख समुदायात ससाईमुळे सलोखा निर्माण झाला आणि दंगली कायमच्या संपुष्टात आल्या, हे वास्तव आहे! भंते ससाईसाठी बोधिसत्त्व नागार्जुनाचा अधिवास शोधण्यापेक्षा जास्त महत्वाचे होते गरीब, असहाय बौद्ध समाजाला सावरण्याचे. त्यांना एक सूत्रात बांधण्याचे. ‘जय भीम’च्या अस्मितेने जगण्याचे. सर्वसामान्य लोकांमध्ये राहत असल्याने भंते ससाईबद्दल लोकांचा विश्वास वाढला होता. त्यांच्या आवाजात सामान्य लोकांच्या आवाजाचे वजन आले. त्यांचा प्रभाव महाराष्ट्राबाहेर पसरला. मान्यवर कांशीरामसारख्या नेत्यांमुळे ते बहुजन समाजापर्यंत पोहचले. त्यांनी सामाजिकदृष्ट्या सक्रिय बुद्धिस्मचा मार्ग पत्करला. त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम सुरू केले. सहा महिने बुद्धगया येथे सामान्य भिक्खू म्हणून राहून, सर्व काही निरक्षून, अभ्यासून त्यांनी ऑक्टोबर 1992 मध्ये ‘चैत्यभूमी ते बुद्धगया’ अशी 5000 की.मी. ची ‘जनजागृती यात्रा’ काढली. शेकडो महिला-पुरुष घेऊन निघालेली ती महिनाभराची यात्रा एखाद्या युद्धासारखीच रोमांचक होती. त्यांनी पुढे वीस वर्ष अनेक प्रकारे आंदोलन केले. या योद्धा भिक्खूने संपूर्ण भारतभर फिरून आपल्यासारखे असंख्य योद्धा भिक्खू तयार केले. त्यांचे संघटन निर्माण केले. त्याला ‘धम्म सेना’ असे नाव दिले. महाबोधी महाविहार मुक्तीसाठी त्यांनी सन 2012 मध्ये सर्वोच्च न्यायालयात पिटिशन दाखल केली. ते पिटिशन अंतिम टप्प्यात आले आहे. परंतु ससाईंनी महाविहाराच्या संपूर्ण मुक्तीसाठी रस्त्यावरचा संघर्ष कधीच बंद केला नाही. तो आणखी विस्तारित केला. मे 1998 मध्ये, महाबोधी महाविहार मुक्ती संघर्ष सुरू असतानाच, भारताने 11 मे रोजी बुद्ध जयंतीदिवशी अणुचाचण्या केल्या. यामुळे ससाई प्रचंड उद्वेलीत झाले. त्यांना हिरोशिमा-नागासाकीचा विध्वंस आठवला आणि भारताने तो मार्ग अवलंबू नये ही त्यांची तीव्र भावना होती. 10 जून 1998 रोजी त्यांनी शेकडो भिक्खू व हजारो लोकांसह संसदेकडे मोर्चा काढला. पोलिसांनी अडवले असतानाही ते ट्रकवर उभे राहून सत्तेला आव्हान देत म्हणाले, ‘हा विजय नाही, हा वेडेपणा आहे.’ सत्य संकटात असल्याचे पाहून योद्धा भिक्खू, सुरेई ससाई, सरकार विरुद्ध संघर्ष करायला गेल्यावाचून राहू नाही शकला. या आंदोलनात डॉ. बाबासाहेबांचे निजी सहायक नानकचंद रत्तू हे देखील उपस्थित होते. त्यांनी मुद्दाम त्या दिवशी या असामान्य भिक्खूची भेट घेतली आणि आपला परिचय दिला. भंते ससाईंच्या आयुष्यात अनेक लोक आले. काही विद्वान होते. काही कार्यकर्ते होते. काहींची हिंसक, आपराधिक पार्श्वभूमी होती. त्यांनी कुणालाही नाकारले नाही. कुणाबद्दलही पूर्वाग्रह ठेवला नाही. पण त्यांचा कायापालट मात्र केला. लोक येत गेले, काही टिकले, काही सोडून गेले. वयाच्या 91 वर्षांनंतरही ते तितकेच सक्रिय आहेत. वयाप्रमाणे आलेल्या दुर्बलतेवर मात करीत त्यांचे युद्ध सुरूच आहे. त्यांच्या भोवती कोणतीही नाट्यमय आभा नाही. नागपूरमध्ये बुद्ध विहारांची अपार संपदा, मनसर-रामटेक येथील बोधिसत्त्व नागार्जुन यांच्या अधिवासाचा आणि छत्तीसगढ मधील सिरपूर येथील बौद्ध वारस्याचा पुरातत्व शोध, महाबोधी महाविहार मुक्ती संग्रामाचा निर्णायक लढा हे आणि असे अनेक प्रसंग भंते ससाई यांच्या गेल्या साठ वर्षांच्या वास्तव्याची देण आहे. पुरातत्व विभागाने सिरपूर येथील एका उत्खननाला ‘ससाई मोनास्टरी’ असे नाव देऊन त्यांच्या कार्याची पावतीच दिली. भूतकाळात जगून श्रेय घेत मिरवणे हे या योद्धा भिक्खूचे लक्षण नाही. ते याही वयात इंदोरा बुद्ध विहारात दुसऱ्या मजल्यावर त्याच एका लहानश्या खोलीत राहतात जिथे ते नागपुरात आल्यानंतर पहिल्यांदा राहायला गेले होते. कोणताही बडेजाव नाही, भौतिक वैभव नाही. वैभव आहे ते फक्त सत्याचे, डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे आणि समाजाशी निगडित बौद्ध जीवन पद्धतीचे, ‘जय भीम’ या संस्कृतीचे! डॉ. बाबासाहेबांना खऱ्या अर्थाने समजणारा, त्यांना आदर्श ठेऊन जगणारा, त्यांचा कट्टर अनुयायी आहे हा योद्धा भिक्खू, भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई. या योद्धा भिक्खूचा विश्वास आहे की ‘जय भीम’ या दोन शब्दातच बौद्ध जीवनाचा सार आहे. ■ ■



ॲड. हरिश्चंद्र सुखदेवे
मो. 9422811511

# बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान आणि बौद्ध पौर्णिमेचे महत्त्व




बौद्ध धम्म हा जगातील एक अत्यंत महत्त्वाचा, प्राचीन आणि प्रभावशाली धम्म आहे. इ.स.पूर्व सहाव्या शतकात गौतम बुद्ध यांनी मानवाच्या दुःखमुक्तीचा मार्ग दाखवण्यासाठी या धम्माची स्थापना केली. बौद्ध धम्म हा केवळ धार्मिक प्रणाली नसून तो एक सखोल तात्त्विक, नैतिक आणि सामाजिक विचारप्रणाली आहे. यात मानवी जीवनातील दुःख, त्याची कारणे, त्यावर उपाय आणि अंतिम मुक्ती यांचे अत्यंत तर्कसंगत आणि अनुभवाधारित विश्लेषण आढळते. म्हणूनच बौद्ध धम्माला ‘जीवनशास्त्र’ असेही संबोधले जाते. भारतातील महान विचारवंत आणि समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘बुद्ध आणि त्याचा धम्म’ या ग्रंथात बौद्ध धम्माचे महत्त्व अधोरेखित करताना नमूद केले आहे की, आधुनिक विज्ञाननिष्ठ समाजासाठी बौद्ध धम्म हा सर्वश्रेष्ठ आणि व्यवहार्य पर्याय आहे. त्यांनी विविध धर्मांचा सखोल अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की बौद्ध धम्म हा तर्क, विवेक, समता आणि मानवतेवर आधारित असल्यामुळे तो इतर धर्मांपेक्षा अधिक प्रगत आहे. त्यांच्या मते, जर जगाला शांतता आणि समता हवी असेल, तर बौद्ध धम्माचा स्वीकार करणे आवश्यक आहे. गौतम बुद्धांचे जीवन हे बौद्ध तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म इ.स.पूर्व 563 मध्ये लुंबिनी येथे झाला. त्यांचे मूळ नाव सिद्धार्थ गौतम होते. वडील शुद्धोधन हे शाक्य गणराज्याचे राजा होते आणि आईचे नाव महामायादेवी होते. राजवाड्यातील ऐश्वर्यपूर्ण जीवन असूनही सिद्धार्थ अत्यंत विचारशील आणि संवेदनशील होते. त्यांनी कठोर तपश्चर्येने जीवनाचे मर्म समजून घेतले आणि त्यांनी संसाराचा त्याग करून सत्याच्या शोधासाठी प्रयाण केले. सहा वर्षांच्या कठोर तपश्चर्येनंतर बोधगया येथे बोधीवृक्षाखाली त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते ‘बुद्ध’ म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यानंतर त्यांनी सारनाथ येथे पहिला उपदेश देऊन धर्मचक्रप्रवर्तन केले. त्यांनी आपल्या शिकवणीत अंधश्रद्धेला विरोध करून तर्क, अनुभव आणि नैतिकतेवर आधारित जीवन जगण्याचा मार्ग दाखवला. बौद्ध तत्त्वज्ञानाचा गाभा म्हणजे चार आर्यसत्ये. त्यानुसार जीवन दुःखमय आहे (दुःख), या दुःखाचे मूळ तृष्णेत आहे (दुःखसमुदय), दुःखाचा अंत शक्य आहे (दुःखनिरोध) आणि त्या अंतासाठी अष्टांगिक मार्ग अनुसरणे आवश्यक आहे (दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा). अष्टांगिक मार्गामध्ये सम्यक दृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयास, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी यांचा समावेश होतो. हा मार्ग माणसाला नैतिक, मानसिक आणि बौद्धिक प्रगती साधण्यास मदत करतो. बौद्ध तत्त्वज्ञानातील अनित्यता ही संकल्पना सांगते की जगातील प्रत्येक गोष्ट सतत बदलत असते. कोणतीही गोष्ट कायमस्वरूपी नाही. जीवनातील सुख-दुःख, भावना, विचार हे सर्व क्षणभंगुर आहेत. ही जाणीव माणसाला आसक्तीपासून दूर ठेवते आणि त्याला शांततेचा अनुभव देते. त्याचप्रमाणे अनात्मवाद या संकल्पनेनुसार स्थिर आत्मा अस्तित्वात नाही. मानव हा रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान या पाच स्कंधांनी बनलेला आहे. त्यामुळे ‘मी’ ही भावना तात्पुरती आणि बदलणारी आहे. प्रतीत्यसमुत्पाद हा बौद्ध तत्त्वज्ञानातील एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे. या सिद्धांतानुसार प्रत्येक घटना ही दुसऱ्या घटनेमुळे निर्माण होते. कोणतीही गोष्ट स्वतंत्रपणे अस्तित्वात नसते. कारण आणि परिणाम यांच्या साखळीमुळेच सर्व गोष्टी घडत असतात. त्यामुळे जीवनातील सर्व गोष्टी परस्परावलंबी आहेत, हे स्पष्ट होते. बौद्ध धम्माचा अंतिम उद्देश म्हणजे निर्वाण प्राप्त करणे. निर्वाण म्हणजे तृष्णा, अज्ञान आणि दुःख यांचा पूर्ण अंत होणे. ही अवस्था प्राप्त झाल्यावर माणूस पूर्णतः मुक्त, शांत आणि समाधानाने परिपूर्ण होतो. बुद्धांनी नैतिक जीवनावर भर देत पंचशील सांगितले आहेत. प्राणिहिंसा करू नये, चोरी करू नये, खोटे बोलू नये, व्यभिचार करू नये आणि मादक पदार्थ सेवन करू नये हे पंचशीलाचे नियम आहेत. हे नियम समाजात नैतिकता आणि शिस्त निर्माण करतात. बौद्ध धम्माचा समाजावर अत्यंत सकारात्मक प्रभाव पडला आहे. बुद्धांनी जातिव्यवस्थेला विरोध करून सर्व मानव समान आहेत, हे प्रतिपादन केले. त्यांनी स्त्रियांना समान अधिकार दिले आणि अहिंसा, करुणा आणि बंधुता यांचा प्रसार केला. सम्राट अशोक यांनी बौद्ध धम्माचा प्रसार भारताबाहेरही करून तो आशियातील अनेक देशांमध्ये पोहोचवला. आधुनिक काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1956 मध्ये नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारून त्याला नव्याने सामाजिक आणि मानवतावादी दिशा दिली. त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाला समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांशी जोडले आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्याचा प्रभावी उपयोग केला. बौद्ध धम्माच्या संदर्भात बौद्ध पौर्णिमा या सणाचे विशेष महत्त्व आहे. बौद्ध पौर्णिमा, ज्याला वैशाख पौर्णिमा असेही म्हणतात, हा बौद्ध धर्मातील सर्वात पवित्र दिवस मानला जातो. या दिवशी तीन महत्त्वाच्या घटना घडल्या असे मानले जाते. गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण. त्यामुळे हा दिवस त्रिवार पवित्र मानला जातो. बौद्ध पौर्णिमेच्या दिवशी बौद्ध अनुयायी बुद्धांच्या शिकवणीचे स्मरण करतात, ध्यान-धारणा करतात, दानधर्म करतात आणि नैतिक जीवन जगण्याचा संकल्प करतात. विहारांमध्ये विशेष पूजा, प्रवचने आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. लोक गरीबांना अन्न, वस्त्र आणि औषधे देऊन करुणा आणि दयाभाव व्यक्त करतात. हा दिवस केवळ धार्मिक नसून मानवी मूल्यांचे स्मरण करून देणारा आहे. बौद्ध पौर्णिमा आपल्याला बुद्धांच्या शिकवणीचा सार सांगते, अहिंसा, करुणा, समता आणि विवेक. आजच्या तणावपूर्ण आणि संघर्षमय जीवनात या मूल्यांची आवश्यकता अधिक आहे. हा सण आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील दोष दूर करण्याची आणि शांत, नैतिक जीवन जगण्याची प्रेरणा देतो. अशा प्रकारे बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक विचार नसून ते जीवन जगण्याची एक वैज्ञानिक, नैतिक आणि मानवतावादी पद्धत आहे. ते मानवाला विवेक, करुणा, समता आणि शांततेचा मार्ग दाखवते. आधुनिक विज्ञानयुगातही बौद्ध तत्त्वज्ञानाची उपयुक्तता कमी झालेली नाही, उलट ती अधिकच वाढली आहे. बौद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने आपण बुद्धांच्या शिकवणीचा स्वीकार करून समाजात शांतता, बंधुता आणि समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणूनच बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान आणि बौद्ध पौर्णिमेचे महत्त्व आजच्या काळात अधिक अधोरेखित होते. ■ ■

प्रा. डॉ. वैशाली धनविजय
मो. 9021469133

# बुद्ध म्हणजे मानव जातीसाठी प्रकाशमय वाट




तथागत गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान अहिंसेवर आणि करुणेवर आधारित असले तरी, ते रूढी परंपरेवर जोरदार प्रहार करणारे आहे. तत्कालीन समाज व्यवस्थेतील विघातक रूढी परंपरांना बुद्धांचे तत्त्वज्ञान तितक्याच ताकदतीने छेद देते. या दृष्टीने गौतम बुद्ध यांना क्रांतिकारी बुद्ध असे संबोधने ही अतिशयोक्ती नसून ऐतिहासिक सत्य समजावे लागेल. कारण त्यांच्या विचारांनी आणि कृतीने धार्मिक परिवर्तनच घडले नाही तर सामाजिक, नैतिक आणि बौद्धिक क्षेत्रातही एक मोठी क्रांती घडवून आणली. त्यांनी शोषणमुक्त समतेवर आधारित समाजाचा विचार मांडला. जो त्या काळात क्रांतिकारी ठरला. बुद्ध पौर्णिमा म्हणजे वैशाख शुद्ध पौर्णिमा. बौद्ध धर्मीयांसाठी या दिवसाचे महत्व अतिशय महत्त्वाची मांनले जाते. या दिवशीच तथागत भगवान गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तीन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. या महत्त्वपूर्ण दिनानिमित्त तथागताचा जीवन प्रवास आणि त्यांनी दिलेल्या सम्यक मार्गाचा अभ्यास करणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. बुद्ध म्हणजे ‘जागृत झालेला’, सम्यक म्हणजे ‘योग्य’, गौतम बुद्ध हे केवळ धार्मिक गुरु नव्हते तर ते मानवजातीसाठी एक प्रकाशवाट दाखवणारे विचारवंत होते. त्यांनी मानवाच्या जीवनातीला दुःखावर उपाय शोधण्यासाठी आपले वैभव, कुटुंब व राजसत्ता यांचा त्याग केला. त्यांचा जीवन प्रवास म्हणजेच समतेकडे नेणारा मार्ग आहे. गौतम बुद्ध यांचा जन्म इ. स. पूर्व 563 लुंबिनी आत्ताचा नेपाळ येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शुद्धोधन आणि आईचे नाव महामाया असे होते. बुद्धांचे लौकिक नाव सिद्धार्थ असे होते. वय 29 वर्षाची असताना ज्ञानप्राप्तीसाठी त्यांनी केलेला गृहत्याग ही अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आहे. या घटनेने सिद्धार्थ सम्यक समृद्ध झाले आणि जगास एक नवा विज्ञानवादी दृष्टीकोन मिळाला. बुद्धाने आपल्या पहिल्याच धर्मप्रवचनात चार आर्य सत्य मांडले. हे तत्वज्ञान मानवी जीवनाच्या मुळत असलेल्या समस्याचा उगम आणि त्यावरील उपाय स्पष्ट करते. दुःख- जीवनात दुःख आहे, जन्म, रोग, मृत्यू वियोग, अप्रितीसंपर्क, इच्छित न मिळणे हे सर्व दुःखाचे प्रकार आहेत.

**दुःखाचे कारण :** दुःखाची मूळ कारण तृष्णा आहे ही तृष्णा म्हणजे इच्छा आसक्ती.

**दुःख निवारण :** तृष्णेचे निवारण करणे म्हणजे दुःखाचा नाश होतो. दुःखाचा निरोधः त्यासाठी मध्यम मार्ग म्हणून आर्य अष्टांगिक मार्गाचा अवलंब करावा लागतो. बुद्धांनी सांगितलेले अष्टांगिक मार्ग म्हणजेच सम्यक जीवनशैलीचा मार्ग आहे. हे आठ अंग म्हणजे सम्यक दृष्टी-जीवनाचे यथार्थ ज्ञान सम्यक संकल्प-योग्य विचार व निर्धार सम्यक वाणी-खोटी, कट्टू निंदा करणारी भाषा टाळणे. सम्यक कर्म-हिंसा, चोरी, दुराचार, यापासून दूर राहणे. सम्यक आजीविका - प्रामाणिक आणि अहिंसक पद्धतीने जीवन जगणे सम्यक प्रयास-वाईट विचार दूर करून चांगले विचार वाढवणे. सम्यकस्मृती - सजगक्ता व आत्मनिरीक्षण सम्यक समाधी - ध्यान धारणा आणि मानसिक स्थैर्य या अष्टांगिक मार्गाचा अवलंब केल्यास मानवाच्या जीवनात दुःखाचे निवारण होते. बुद्धांनी अति-सुख आणि अति - तप यांना नाकारून मध्यम मार्ग सांगितला. जीवनात तटस्थ राहणे. संतुलितपणे व संयमाने वागणे हेच खरे बुद्ध तत्वज्ञान आहे. शरीराला कष्ट देऊन आत्मज्ञान मिळत नाही. तसेच भोगवीलासात गुरफटुनही समाधान मिळत नाही. असे भगवान बुद्ध म्हणतात. सर्व प्राणी दुःख भोगतात म्हणून त्यांच्याशी करुणेने वागणे असा संदेशही देतात. बुद्ध काळात भारतीय समाज व्यवस्थेने विभागलेला होता. तत्काळीन व्यवस्थेमध्ये जन्मावर आधारित श्रेष्ठता मानली जाते. बुद्धांनी या व्यवस्थेला खुलेआम जन्म आधारित श्रेष्ठतेचा पूर्णतः निषेध, विरोध केला. तथागत बुद्धाने स्त्रियांनाही भिक्खू संघात प्रवेशाची परवानगी दिली. त्या काळात स्त्री स्वातंत्र्याची ही क्रांतिच होती. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींनाही त्यांनी धम्मामध्ये स्थान दिले. बुद्धांनी यज्ञ, बलिदान, मंत्र या रूढीचा विरोध केला. असा धम्म सांगितला की तो अनुभवसिद्ध तर्कशुद्ध, विज्ञानवादी होता आणि तो प्रत्येकांसाठी खुला होता. त्यांच्या धम्मात अंधश्रद्धेला कुठलेही स्थान नव्हते. बुद्धाने धम्म आचरणावर भर दिला. बुद्धाने सांगितलेल्या पंचशील मार्गाचा आणि अष्टांगिक मार्गाने, व्यक्ती आणि समाजाच्या नैतिक प्रगतीचा मार्ग दिला. सत्य बोलणे, प्राणी हिंसा न करणे, चोरी न करणे, संयम पाळणे, मादक पदार्थाचे सेवन न करणे या नीती मूल्यांची अंमलबजावणी म्हणजे एक नैतिक क्रांतीच होती. बुद्धांनी आत्मा, ईश्वर, पुनर्जन्म या संकल्पनावर वेगळा दृष्टिकोन मांडला. त्यांनी अनात्मवाद प्रतित्यसमूत्पाद यासारख्या संकल्पना मांडून मानव केंद्रित तत्त्वज्ञान निर्माण केले. त्यांनी मानवाच्या प्रगतीसाठी विचार स्वातंत्र्य, विवेक बुद्धी, संशोधनशीलता यांचा विचार केला. बुद्धांची क्रांती ही रक्तपात किंवा हिंस्त्र बंड नव्हते. ती होती मनातली क्रांती, सम्यक विचाराची, शांतता मूलक क्रांती. तथागताने हिंस्त्र समाजाला अहिंसेचा, विषमतेच्या व्यवस्थेला समतेचा आणि अंधश्रद्धेला विवेकाचा मार्ग दाखवला. गौतम बुद्ध हे केवळ धम्म प्रवर्तक नव्हते तर ते समाजक्रांतीचे महान प्रवर्तक होते. त्यांनी शोषण, विषमता, अंधश्रद्धा, जातीयता यांच्यावर प्रहार करत सम्यक समतावादी, समाजाची कल्पना प्रत्यक्षात साकारली. म्हणूनच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तथागत बुद्धांना सर्वात मोठा ‘क्रांतिकारक’ म्हटले आहे. बुद्धांनी समतेवर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तथागत गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान हे मानव जातीच्या उद्धारासाठी आणि दुःख मुक्तीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांनी कोणत्याही ईश्वरसत्तेवर अवलंबून न राहता मनुष्याने स्वतःच स्वतःच्या दुःखापासून मुक्त व्हावे असा मार्ग दाखवला. त्यांचे तत्त्वज्ञान हे प्रत्यक्ष अनुभवातून केलेले व्यवहार्य व अत्यंत वैज्ञानिक पातळीवर खरे उतरणारे होते. तथागत बुद्धांची शिकवण आजच्या काळातही अत्यंत सुसंगत वाटते. कारण ती मनुष्याला मानसिक शांतता, तटस्थता आणि समानता देणारी आहे. आजच्या ताणतणावाने भरलेल्या आणि भौतिक गोष्टींकडे झुकलेल्या जगात बुद्धाचा सम्यक मार्ग अधिक महत्त्वाचा वाटतो. बुद्धांनी सांगितले ‘अत्त दीपो भव’ म्हणजेच स्वतःच स्वतःचा दीप बना, ही संकल्पना आजच्या युगातील तरुणांना आत्मनिर्भर्तेकडे नेण्यास प्रेरणा देते. बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने आपण केवळ भगवान बुद्धाचे जन्म स्मरण करून नव्हे तर त्यांच्या विचारांचा स्वीकार करून, आपल्या जीवनात उतरवणे गरजेचे आहे. सम्यक बुद्धांचा जीवनप्रवास, त्यांची सम्यक दृष्टी आणि त्यांनी दाखवलेला मध्यम मार्ग हा मानवतेसाठी एक अनमोल ठेवा आहे. जगभरात अनेक अनुयायी आणि राष्ट्रांनी बुद्धांच्या विचारांचा स्वीकार केला आहे आणि त्यामुळेच आजही बुद्धाचा प्रकाश जगभर पसरलेला आहे. त्यांच्या शिकवणीचा प्रसार आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे. ■ ■



ज्योत्सना बनसोड
8766942982

# अत्त दीप भवं

सिद्धार्थ गौतम बुद्ध, शांती, समता, करूणा, आनंद, मैत्रीचा एक अखंड स्त्रोत, मानवतेचा हिमालय, समाजातील साऱ्याच अनिष्ट गोष्टी, दुःख, शोषण, सामाजिक व्यंग, कुरूपता, कौर्य, हिंसा या अधोगती व अधःपतनाच्या आणि एकूणच साऱ्याच अंधारखाटेचा एक प्रकाशदीप. माणसाला प्रबुद्ध माणूस होण्यासाठी त्याच्या स्वतःमधेच अस्तित्वात असलेल्या, स्वतःच्याच आनंदाचा, शांती, मैत्री, प्रेम, करूणेचा शोध घेण्यास प्रवृत्त करणारा, त्याला त्याच्या ‘प्रज्ञेची’ ओळख करून देणारा एक समाज शिल्पकार, पथप्रदर्शक. सिद्धार्थ गौतमाचा जन्म एका राजघराण्यात झाला. सर्व सुखसोयी, समद्धी, त्यांच्या पायाशी दंडवत घालीत होत्या. जन्मापासुनच दुःख, दैन्य, वेदना, कुरूपता, रोगी, दारिद्र, हिंसा या सिद्धार्थाच्या दृष्टीलाही पडता कामा नये, असाच सारा कडेकोट बंदोबस्त होता. पिता शुद्धोधनाने तसी जातीने व्यवस्था केली होती. ‘समृद्धी’ व ‘सुखाची’ नुसती ‘उघळण’ केली होती. परंतु जन्मतःच सिद्धार्थाचे शांत व करूणाप्रिय मन ‘त्या’ ‘सुख’ ‘समृद्धीमध्ये’ रमु शकले नाही. ऐहीक, भौतीक, स्वर्गसुखी व्यवस्था ‘त्याला’ त्यांचे ‘सुख’ देऊ शकले नाही. बंधु देवदत्ताच्या बाणाने विव्हळ झालेला राजहंस पक्षाच्या सेवेत त्यांच्यातील करूणेने पहीले ‘पाऊल’ टाकले व नंतर रोहीणी नदीच्या पाणी वाटपावरून शाक्य व कोलीयामध्ये जो युद्धप्रसंग उभा राहिला, त्या प्रसंगामध्ये त्यांच्यातील करूणेने एक भिंतच उभी केली. प्रसंगी ते गृहत्यागाची शिक्षा भोगण्यास तयार झाले, परंतु युद्धाला त्यांचा विरोध कायम होता. निसर्गाचे पाणी मानसाच्या जीवनासाठी या सृष्टीला मानवी जीवनाला फुलविण्यासाठी आहे, जीवन घेण्यासाठी अथवा संपवण्यासाठी नाही. पाण्यासाठी रक्त सांडावे, यासाठी त्यांचे मन द्रवले व त्यामुळेच ‘तथागत’ घडविणारा ‘गृहत्याग’ घडून आला. करूणामुर्ती सिद्धार्थचा प्रवास सुरू झाला. तो अनेक प्रश्नांची मालिका घेऊनच माणूस दुःखी, व्यथीत का? माणूस हिंसा का करतो? प्रवाहपतित का होतो? शोषक, शोषीत का होतो, राहतो? त्याचे कारण काय? त्याच्या दुःखमुक्तीचा मार्ग आहे काय? तो काय असावा? कसा असावा? हि व्यवस्था का व कशी आहे? सृष्टी काय? तिचे रहस्य काय? इत्यादी अनेक प्रश्नाच्या उत्तरासाठी, मग त्या काळचे सारेच प्रचलित धर्म, संप्रदाय, त्यांचे लिखीत अलिखीत ग्रंथ, गुरुशिष्यांच्या परंपरा, वेद, पुराण, आत्म, अनात्मवाद, द्वैत, अद्वैत, तत्वज्ञान, भोगी, त्यागी, स्वच्छंदी परंपरा, स्वैराचारी, आत्मक्लेषी, श्रमण, ब्राम्हण अशा सर्वच विचार, आचार व उपासना, भक्ती परंपरेचा निरपेक्ष अशा पद्धतीने, सिद्धार्थ गौतमाने सतत भटकत शोध घेत, समजून घेत, जिवाच्या, मनाच्या बुद्धीच्या एकाग्रतेने अभ्यास केला, परिचय केला, निकोप मनाने त्यावर विचार, चिंतन, मननही केले. परंतु या सर्व गोष्टी त्यांच्या करूणाप्रिय मनाला सत्याच्या शोधक बुद्धीला समाधान देऊ शकल्या नाही. त्यामुळे नंतर त्यांनी स्वतःच्याच बुद्धी, मन, भावना, विचार व अनुभवाला प्राधान्य देऊन, साक्षी ठेऊन आत्मचिंतन व मननाचा नवा प्रवास सुरू केला. त्यातून त्यांना ‘नवा बोध झाला, बुद्धत्व प्राप्त झाले. मानवी दुःख, दैन्य आपत्तीला, देव, दैव, नियती, प्रारब्ध, पुनर्जन्म या गोष्टी कारणीभूत नाहीत. माणसामधील अकुशल भावना व विचार, अज्ञान व त्यातून घडणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया कारणीभूत आहे. माणसाने आपल्या मनाचा सतत शोध घेत व त्यातील कुरूपता, अकुशलता व नकारात्मक गोष्टीची ओळख करून, या गोष्टी आपल्या मधून हळूहळू का होईना दूर व नाहीशा कशा करता येईल, कशा होतील याचा सतत प्रयत्न करावा व सद्भावना व सद्‌विचार याचा अंगीकार करून इतरांचे व स्वतःचेही मंगल करावे. हाच बुद्धाच्या बुद्धत्वाचा शोध. (सब्ब पापस्स अकरणं कुशलस्स उपसंपदा, सच्चीतपरीयोदपनम् एतन् बुद्धान् शासनम्) या जगामध्ये क्षणोक्षणी परीवर्तन घडत असते.




कुठलीही गोष्ट स्थिर अथवा शाश्वत नाही. चैतन्य अथवा उर्जा आणि जडनैतिकता किंवा पंचमहाभुत यांच्या समन्वयातून अथवा संधर्वातून, सृजनाची, बदलाची, प्रक्रिया सतत सुरू असते. जेंव्हा ती मानवी प्रयत्नातून शास्त्रीय पद्धतीने घडते, तेंव्हा आपण त्याला विज्ञान म्हणतो. सृष्टीसंयोगातून आपोआप घडते, तेव्हा त्याला निसर्गाचा चमत्कार अथवा सृष्टीनियम असेही म्हणतो, परंतु या सर्व गोष्टी अथवा या घटनेमागे एक कार्यकारण भाव असतो, असे बुद्धाचे म्हणणे आहे. केवळ सृष्टीच्याच नव्हे, तर मानवी अथवा समाज जीवनातील प्रत्येक घटनेमागे, व्यवहारामागे एक कार्यकारण भाव असतो, त्याच्या मुळाशी एक कारण असते, त्यामुळे कार्य घडते व कार्यवाही परिणामातून एक ‘कारण’ तयार होते. असा कार्यकारणभावाचा वैज्ञानिक सिद्धांत बुद्धाने मांडला. हि बुद्धाची चिंतनाची, परीक्षण, निरीक्षण व अभ्यासाची एक विलक्षण व अजोड अशी देणगी इथल्या साऱ्या शास्त्रजगताला आहे. त्याहीपेक्षा बुद्धाने माणसाला माणसातील उर्जेची, बुद्धी व मनाच्या प्रचंड अशा सामर्थ्यांची ओळख करून दीली. या सृष्टीमध्ये, माणसामध्ये, मानवी, समाजामध्ये प्रचंड असे विधायक Positive व सम्यक Nobel परीवर्तन घडवून आणण्याची शक्ती, उर्जा ही केवळ आणि फक्त माणसामध्येच आहे. याची स्वानुभावी जाणीव Awareness मानवी समाजाला करून दिली. माणसाने सद्‌विचार, सद्भावना याचा अंगीकार करून, सम्यक संकल्प, सम्यक स्मृती, आजिवीका व सम्यक प्रयत्न करून अष्टांग मार्गाने आपल्या जीवनाचा प्रवास केला, तर माणसाला स्वतःमध्येच दडून असलेल्या शांती, समता, प्रेम, करूणा, मैत्रीचा साक्षात्कार होईल. आपल्यामध्येच ‘प्रबुद्ध माणसाचे’ बिज दडलेले आहे याची जाणीव होईल. कारण माणसामध्येच देवत्वाचे, प्रबद्धतेचे, श्रेष्ठ मानवी गुण दडलेले आहे. हे बुद्धाने माणसाला आपल्या निरनिराळ्या आराधना, साधना, उपासना, आचार, विचार पद्धतीने व शिकवणूकीने आणि तेही अत्यंत साध्या, सोप्या, सरळ भाषेत समजावुन दिले. आजच्या भारताच्या सामाजिकच नव्हे तर एकूणच व्यवस्थेचा विचार केला तर चित्र फार आशादायक आहे असे कुठल्याही प्रामाणिक, बुद्धी व मन शाबुत असलेल्या माणसाला खचितच वाटणार नाही. जातीयवाद माणसाच्या मना मेंदुमध्ये घुमसतो आहे, धार्मिक उन्मादाने तर ‘शैतानी’ ‘सीमा पार केल्या आहे व संहारक रूप धारण करून सारे समाजजीवन वेठीस धरले आहे. बॉम्बस्फोट, जाळपोळ, भोकसाभोकसी, बलात्कार ही याच उनमादाची अपत्य आहेत. सर्वत्र असुरक्षिततेच्या कोंडवांडण्यात आजच समाजजीवन गुदमरते आहे. ‘माणूस’ ‘स्वतःमधील’ ‘माणसालाच’ विसरला कि काय? असे वाटायला लागले आहे. तथाकथीत धार्मीकतेच्या पारंपारीक अहंकाराने उन्मत्त होऊन साऱ्या अकुशल व विध्वंसक गोष्टी करण्याकडेच माणसाचाच नव्हें तर समुहाचाही कल वाढलेला आहे. आजच्या विज्ञानयुगातही, मध्ययुगीन उन्माद, धर्माच्या, जातीच्या नावाने वेगवेगळ्या स्वरूपात थैमान घालतो आहे. या साऱ्याच गोष्टी सुबुद्ध मनाला विषण्ण करणाऱ्या, चिड आणणाऱ्या आहेत. मंदीर, मंत्रालय, अगदी सर्वच क्षेत्रातच नव्हे, माणसाची मन, मेन्दु भ्रष्टाचाराच्या भुताटकीने पछाडलेली आहे. सर्वत्र भीषण, संहारक म्हणून चिंताजनक घटनांनी आजच समाजजीवन वेढलेले आहे व समाजमन भेदरलेल आहे. मानवी अस्तित्वालाच प्रश्नचिन्ह लागत आहे. ही आपली प्रगती कि अधोगती, विकास कि विनाश याचा अंतर्मुख होऊन विचार करावयाचा आहे. भौतिक, वैज्ञानिक क्षेत्रात आपली प्रगती पाहीली तर सारे स्वर्गसुख आपण पृथ्वीवर आणून प्रथम त्यांना आपण ‘दास’ बनविले व आता त्याच भौतिक सुखाचे आपण ‘दास’ बनलो आहोत. कारण ते भौतिक ‘ऐहीक’ सुख उपभोगण्यापेक्षा बाळगण्यात व दाखवण्यातच आपण आपले सारे कर्तृत्व, प्रतिभा, चिंतन, ध्यान राबविले आहे. पद, प्रतिष्ठा, भौतीक वस्तुंची रेलचेल, त्याच चकाकत प्रदर्षण हेच ध्येयप्राप्तीचे शिखर समजुन त्या आंधळ्या शर्यतीमध्ये आपण आपल्यासमोरचा ‘माणूस’ व आपल्या स्वतःमधलाही ‘माणूस’ विसरून बसलो आहे. बुद्धाच्या शिकवणुकीचा, धम्माचा, केन्द्रबिंदु फक्त माणूस आहे. बुद्धाच्या शिकवणुकीचा आरंभ, मध्य व अंतही फक्त ‘मानवी कल्याणच’ आहे. या जगात करूणा, प्रेम, शांतीचे, बंधुभावाचे अविरत साम्राज्य, कुठलाही रक्तपात न होता, विध्वंस न होता येवो, हाच बुद्धाच्या शिकवणुकीचा एकमेव उद्देश आहे व हे सारे शक्य आहे आणि बुद्धाने ही जबाबदारी माणसावर टाकलेली आहे. माणसातील सद्भावना, सद्विवेक, प्रेमभावना जागृत शाबुत राहुन ती सक्रिय झाली तर माणूस आनंदमय, शांतीपुर्ण जीवन व्यतित करून आनंदीत राहु शकतो. त्यासाठी माणसाने आपल्या मनाचा शोध घ्यावयाचा आहे. मनाची मशागत करावयाची आहे. ध्यान, मनन, चिंतन याच्या सहाय्याने स्वतःमधील अकुशल विचार भावनांना ओळखुन, त्याला त्यागुन व कुशल, मंगल व सम्यक भावनेच्या विचाराची कास धरून स्वतःसहीत सर्वच मानवजातीला कल्याणकारी शांती करूणामय बनविणाऱ्या विचार भावनेचा प्रचार व प्रसार करावयाचा आहे. माणसाच्या मनामेंदुमध्ये ती अंकुरीत विकसीत व्हावी हाच बुद्धाच्या शिकवणुकीचा मुलमंत्र आहे. यासाठी बुद्धाने कुठलाही देव, आधीभौतीक, प्रेषीत यांच्या शक्तीची वा आराधनेची आवश्यकता प्रतिपादीली नाही. तर स्वतःमधील प्रकाशात स्वतःचाच शोध घेत वाटचाला करायला सांगीतले. ‘अत्त दीप भव’ (स्वतःच स्वतःचा प्रकाश व्हा) ही बुद्धाची शिकवण आपण आपल्या मनामेंदुमध्ये रूजवु या व खऱ्या अर्थाने माणूसकीच्या धर्माचे पाईक होऊ या. ■ ■



सुधाकर लोखंडे
मो. 9970023788





स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १३३

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा इंदोरा नागपूर.

नागपूर शहरातील इंदोरा झोपडपट्टीमध्ये भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. वरील ठिकाणी कमी जागा असताना ओटा बांधून दोन्ही पुतळे आहेत. दिनविशेषला विविध कार्यक्रम साजरा करतात. डॉ. बाबासाहेबांना आपला तारणहार समजून जीवन जगत असतात. येथिल लोकांनी नेत्रदिपक प्रगती केली.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो.9370773608

# प्रबुद्ध समाज निर्मितीत प्रसार माध्यमांना अपयश : भुपेंद्र गणवीर




> “सत्ताधाऱ्यांकडून अमृतकाळाचे गोडवे गायिले जात आहेत. त्या विपरित स्थिती देशात आहे. जातीय व्यवस्था आहे. जातीच्या नावावर अन्याय आहे. अत्याचार आहेत. स्पर्धेत डावलले जात आहे. श्रीमंत-गरीब दरी वाढली आहे. देशातील पन्नास टक्के लोकांकडे केवळ साडे सात टक्के संपत्ती आहे. तर दुसरीकडे एक टक्का कुबेरांकडे 40 टक्के संपत्ती आहे. या विरोधात माध्यम घराणे व राष्ट्रीय माध्यमे लिहित नाहीत. विषमते विरोधात भूमिका घेत नाही. त्यामुळे जातीयता, भ्रष्टाचार, शोषण, घोटाळे, उपासमार चालू आहे. जे 75 वर्षापासून व्यवस्था बदलू शकत नाहीत. अशी माध्यमे असण्यापेक्षा नसलेली बरी. त्यांना अरबी समुद्रात बुडविलेले बरे असे चिमटे काढले. छोटी वृत्तपत्र व समाज माध्यमांकडे धन नाही. मात्र सामाजिक बांधिलकी व नैतिकता आहे. त्या जोरावर ते टिकून आहेत. सामान्य माणसांची लढाई लढत आहेत. बुवाबाजीवर प्रहार करीत आहेत. प्रबुद्ध नागरिक अन्यायाविरोधात उभा राहतो. प्रश्न विचारतो. समतेसाठी झगडतो. विचारात तर्कशक्ती असती असते. कृतीत न्याय असतो. परंतु अलिकडे सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून भय पसरविला जातो. त्यामुळे मोठमोठे नेते सत्तेपुढे नतमस्तक होतात. हे सामान्य माणूस बघतो आहे. तो आपल्या हक्क व अधिकाराची लढाई लढण्यास उभा राहील. तेव्हा व्यवस्था बदलेल. आता लोकशाहीला ईव्हीम घोटाळ्यांनी ग्रासल्याचा संशय आहे. बंगालच्या निकालाबाबतही सांशकता असल्याचे गणवीर म्हणाले. तसेच अ,ब,क,ड उपवर्गिकरणामागे दोन वैचारिक सांस्कृतिक लढे असल्याचे त्यांनी विस्ताराने सांगितले. खासगिकरणाच्या माध्यमातून आरक्षण संपविण्याचा सत्ताधारी कट आहे. सरकारी शाळा बंद करणे. सामान्य वर्गाला नोकऱ्यांच्या स्पर्धेतून बाजूला करणे होय. हे डाव ओळखण्याचे आवाहन केले.
>
> - भूपेंद्र गणवीर

**अमरावती :** सामाजिक, आर्थिक समतेतून सद्दृढ, समृद्ध आणि प्रबुद्ध समाज घडेल. यामध्ये प्रसार माध्यमे प्रभावी भूमिका बजावतील. ही अपेक्षा होती. या कर्तव्यात प्रसार माध्यमे असफल राहिली. ती आता धनिकांची बटिक बनली. तिला बदलणे काळाची गरज आहे. त्याशिवाय प्रबुद्ध समाज निर्मितीचे स्वप्न ही फसवणूक होय. या शब्दात ज्येष्ठ पत्रकार भुपेंद्र गणवीर यांनी प्रसार माध्यमांवर शाब्दिक प्रहार केले. येथील भीमटेकडीवर तीन दिवसीय बुद्ध जयंती महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी पोलिस उपायुक्त श्याम घुगे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौत्तम बुद्ध यांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून महोत्सवाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी उपायुक्त शिंदे व अन्य मान्यवर हजर होते. या कार्यक्रमात प्रबुद्ध भारत घडविण्यात प्रसार माध्यमाची भूमिका या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून गणवीर बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. रवींद्र मुंदे हे होते. मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. कीर्ती ढोले म्हणाले, प्रसार माध्यमांमध्ये वृत्तपत्र, चॅनल, सिनेमा कीर्तनकार देखील येतात. संत गाडगेबाबा, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे दाखले दिले. संविधान सभेत प्रेस स्वातंत्र्यावर चर्चा झाली. त्याला डॉ. आंबेडकरांनी विशेष अधिकार देण्यास नकार दिला. आजची स्थिती बघता त्यांनी हे योग्य केले. एवढी त्यांची दूरदृष्टी होती. अभिव्यक्ती स्वातंत्र्यातर्गत सामान्य माणसाला जे अधिकार आहेत. तेवढेच अधिकार प्रेसला आहेत. मुंबई सकाळचे संपादक राहुल गडपाले यांचेही भाषण झाले. त्यांनी माध्यमांवरील सरकारी निर्बंधाचा मुद्दा मांडला. माध्यमांनी सरकारी दबावाला झुंगारावे असेही आवाहन केले. महोत्सवाचे मुख्य आयोजक सुनील रामटेक यांनी प्रास्ताविक केले.

# दीक्षाभूमीवर तीन दिवसीय बुद्ध महोत्सव

## बुद्धगया महाबोधी महाविहार या विषयावर प्रबोधन

### भदंत सूरेई ससाई यांची उपस्थिती



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी व इतर सदस्यांच्या वतीने तीन दिवसीय बुद्ध महोत्सव (2570 वी बुद्ध जयंती) एक ते तीन मे दरम्यान दीक्षाभूमीवर होत आहे. एक मे रोजी सायंकाळी 6 वा. बुद्धगया महाबोधी महाविहार कायदा या विषयावर प्रबोधन होणार आहे. अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्म सेनानायक भदंत आर्य नागार्जुन सूरेई ससाई यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

ससाई यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या प्रबोधन कार्यक्रमाला माजी न्यायाधीश ओमकारेश्वर काकडे, विजय धांडे यांच्यासह ॲड. शैलेश नारनवरे (उच्च आणि सर्वोच्च न्यायालय), देविदास घोडेस्वार, ॲड. श्रेय डंबारे (सर्वोच्च न्यायालय), डॉ. पी.एस. चंगोले, ॲड. एल.वाय. नंदेश्वर, डॉ. प्रकाश कोसनकर, ॲड. प्रफुल्ल अंबादे, ॲड. रत्नाकर खोब्रागडे, ॲड. संकेत वालदे, ॲड. नेहांशू पाटील, ॲड. बी.बी. रायपूरे, ॲड. विजय जांगलेकर आणि डॉ. मोहन गवई मार्गदर्शन करतील.

भदंत ससाई यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दोन मे रोजी सायं. 6 वा. भिक्खू संघ आणि भिक्खुनी संघातर्फे बुद्धांचा कल्याणाचा मार्ग यावर प्रवचन होणार आहे. या कार्यक्रमाला डॉ. आंबेडकर बुद्धिस्ट सेमिनरीचे मुख्य धम्म प्रशिक्षक भदंत धम्म सारथी, भदंत नागसेन, धम्मविजय, नागवंश, धम्मप्रकाश, भिक्खुनी संघप्रिया थेरी, धम्मदीपा, संघमित्रा, सुनीता, पुणिका, प्रज्ञा गौतमी प्रबोधन करतील.

रविवार तीन मे रोजी सायं. 6 वा. प्रबुद्ध बागडे आणि गायक कलावंत तर्फे 'प्रबुद्ध हो मानवा' हा बुद्ध भीम - गीतांचा कार्यक्रम सादर करतील. या सोबतच अंगुलीमाल, आम्रपाली यावर लघुनाट्य व भीम गर्जना नृत्य सादर करतील. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नन्हा सावाईथुल, शंकर भोयर, अश्विन नितनवरे, नितीन नंदागवळी, धीरज बोरकर, कल्पेश गजभिये, दिनेश चंद्रिकापुरे प्रयत्नशील आहेत.

## महत्वाचे

### विवेकानंदनगर रत्नबोधी विहारात बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम




**नागपूर :** सन्मित्र प्रतिष्ठान, रत्नबोधी विहार, विवेकानंदनगर, नागपूर यांच्यावतीने भगवान गौतम बुद्ध पौर्णिमेनिमित्त दि. 9 मे 2026 रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त सर्व उपासक-उपासिकांना मंगलमय शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. कार्यक्रमाची सुरुवात शुक्रवार दि. 9 मे रोजी सकाळी 9.00 वाजता सामूहिक बुद्ध वंदनेने होणार आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. संध्या राजूरकर (निवासी संपादक, बहुजन सोरभ) यांची उपस्थिती राहणार असून त्या मार्गदर्शनपर उद्बोधन करणार आहेत. तसेच शनिवार दि. 2 मे रोजी सायंकाळी 7.00 वाजता गीत गायन (कराओके) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यानंतर सायंकाळी 8.00 वाजता सहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास परिसरातील बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक सन्मित्र प्रतिष्ठान-रत्नबोधी विहार, नागपूर यांच्या वतीने केले आहे.

### शांतिवन चिचोली येथे आज बुद्ध प्रतिमेची स्थापना व उद्घाटन सोहळा



**नागपूर :** वैशाख पौर्णिमेच्या पावन निमित्ताने शुक्रवार दि. 1 मे 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता शांतिवन, चिचोली येथे 5 फूट उंच भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची स्थापना व उद्घाटन सोहळ्याचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे थायलंड येथून आलेल्या भिक्षुसंघाच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक महत्त्व लाभणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या प्रेरणादायी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन संजय पाटील यांनी केले आहे.

### बुद्ध जयंतीनिमित्त संयुक्त धम्म ग्रंथाचे आज प्रकाशन




**नागपूर :** राष्ट्रीय पारिवारिक धम्म संगोष्टी (भारत) यांच्या वतीने तथागत भगवान बुद्ध जयंतीचे औचित्य साधून दि. 1 मे 2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम दीक्षाभूमी येथे पार पडणार आहे. याप्रसंगी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म (क्रांती-प्रतिक्रांती, कालमार्क्स)' या संयुक्त धम्म ग्रंथाचे प्रकाशन दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भंते आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमात मिलींद बौद्ध कार्याध्यक्ष यांची विशेष उपस्थिती राहणार असून, धम्मप्रेमींसाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.तरी सर्व नागरिक, पदाधिकारी व धम्म अनुयायांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले.

### आज दीक्षाभूमीवर बसपाद्वारा बुद्ध जयंती



**नागपूर :** विश्वशांतीचे प्रतिक तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने बसपाच्या 'कही हम भूल ना जाये' या राष्ट्रीय अभियानांतर्गत दि. 1 एप्रिल रोजी सायंकाळी 6 वाजता दीक्षाभूमी येथे तथागतांना व डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यात येईल. बसपाच्या प्रदेश, जिल्हा, शहर, विधानसभा, सेक्टर व बूथ स्तरावरील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले आहे.

### तन्मयी धनंजय मोटघरेचे सुयश



**नागपूर :** तन्मयी धनंजय मोटघरे मुळची न्यू सुभेदार ले आउट, नागपूरची. हल्ली मुकाम ओजहर नाशिक. ती पोतदार इंटरनॅशनल स्कूल, ओजहर नाशिक येथून दहाव्या वर्गात 89टक्के मार्क मिळाले असून इंग्लिश या विषयात तीला 99टक्के मार्क्स आहेत. तिच्या उज्वल भविष्या करीता मंगलकामना करीत आहोत.

## सम्राट बुद्ध विहार सेवा ट्रस्ट, उपाली कॉलनीत 1 मे रोजी बुद्ध जयंती

**नागपूर :** सम्राट बुद्ध विहार सेवा ट्रस्ट, उपाली कॉलनी (अग्ने लेआऊट, पायोनियर सोसायटी) यांच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांच्या 2570 व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. 1 मे 2026 रोजी सकाळी 9 वाजता सम्राट बुद्ध विहार, उपाली कॉलनी, खामला, नागपूर येथे पार पडणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 9.00 वाजता धम्म ध्वजारोहणाने होईल. त्यानंतर सकाळी 10.00 वाजता धम्मप्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यावेळी धम्मचारी करुणासागर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी 10.45 वाजता आभार प्रदर्शन होईल व 11.00 वाजता खीरदानाचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ए.के. पाटील यांनी केले आहे.

## 36 जिल्ह्यांमध्ये 'आंबेडकर मेळा ऑन व्हील्स' द्वारा वैचारिक जनजागृती



**चंद्रपूर :** बाबासाहेब डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्ताने महाराष्ट्रातील संपूर्ण छत्तीसही जिल्ह्यामध्ये आंबेडकरवादी चळवळीप्रती जनजागृती निर्माण करण्याकरिता मान्यवर कांशीराम यांच्या जयंतीपासून सात टप्प्यांमध्ये 'चालत्या फिरत्या आंबेडकर मेळ्याचे' ('आंबेडकर मेळा ऑन व्हील्स'चे) भव्य राज्यव्यापी जनजागृती अभियान यशस्वी झाले आहे. हे जनजागृती अभियान राबविताना विविध टप्प्यांमध्ये नागपूर, अमरावती, जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, अकोला, वाशिम, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ, नांदेड, लातूर, धाराशिव, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, बीड, परभणी व हिंगोली या 36 जिल्ह्यांमध्ये त्याचप्रमाणे 110 तहसीलमध्ये पोहोचून महाराष्ट्रातील जनमाणसांमध्ये आंबेडकरवादी चळवळीप्रति जनजागृती निर्माण करण्यात आली. या राज्यव्यापी उपक्रमादरम्यान 35 दिवसांमध्ये 7819 किलोमीटरचा प्रवास करीत 223 नुक्कड सभा तथा 32 जाहीर अश्या एकूण 255 सभा घेण्यात आल्या.

या मेळ्याचे समापन दीक्षाभूमी, नागपूर येथे आठव्या बहुजन परिषदेच्या माध्यमातून होणार आहे. या परिषदेस महाराष्ट्रातील तमाम नागरिकांनी आणि प्रतिनिधींनी उपस्थित रहावे असे आवाहन 'कहीं हम भूल न जायें' अभियानाचे ॲड. अतुल पाटील यांनी केले आहे.

## ठाण्यात 'कॉमेडी चेटकीण' नाटकात वत्सल सोरटेची भूमिका




**नागपूर :** समाजसेवक विमल सी.एम. चव्हाण परिवाराशी संबंधित वत्सल सोरटे हा तरुण कलाकार ठाणे येथे रंगभूमीवर झळकणार आहे. शुक्रवार दि. 1 मे रोजी सकाळी 11 वाजता कालिदास कला मंदिर तसेच शनिवार दि. 2 मे रोजी सकाळी 11 वाजता कालिदास घाणेकर नाट्यगृह, ठाणे येथे सादर होणाऱ्या 'कॉमेडी चेटकीण' या नाटकात तो महत्त्वपूर्ण भूमिका साकारत आहे. वत्सल हा डॉ. स्मृती विशाल सोरटे यांचा सुपुत्र असून, त्याच्या या कलात्मक वाटचालीबद्दल परिवारात आनंदाचे वातावरण आहे. या निमित्ताने विमल सी. एम. चव्हाण परिवार, नागपूर यांनी सर्व स्नेही, नातेवाईक व रसिक प्रेक्षकांना उपस्थित राहून वत्सलवर स्नेह व आशीर्वादाचा वर्षाव करण्याचे आवाहन केले आहे.

## राज्य कार्याध्यक्षपदी विक्की कावळे यांची बिनविरोध निवड



**नागपूर :** तांत्रिक कामगार युनियन प्रणीत तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनच्या राज्य कार्याध्यक्षपदी विक्की कावळे यांची बिनविरोध पुनर्निवड करण्यात आली आहे. राज्याध्यक्ष प्रभाकर लहाने यांच्या हस्ते कावळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी राज्याध्यक्ष प्रभाकर लहाने, सरचिटणीस प्रदिप पाटील, राज्य उपाध्यक्ष नितिन भैय्या चव्हाण, राहिल शेख, धिरज घायवट, उप सरचिटणीस अतुल पाटील व दत्तात्रय रायकर, राज्य सचिव विक्रम वाघचौरे व अजित दजगुडे, राज्य संघटक प्रताप खंदारे तसेच कोषाध्यक्ष राम पाटील उपस्थित होते. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी कावळे यांचे अभिनंदन करून संघटनेच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्यात आणि उच्च स्तरावरून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बसपाची डॉ. बाबासाहेबांना जुन्या हायकोर्टासमोर मानवंदना







**नागपूर :** आजपासून 89 वर्षापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सतनामी समाजाच्या महान कार्यकर्त्याची फाशीच्या गुन्ह्यातून निर्दोष सुटका केली तो दिवस 29 एप्रिल व ते ठिकाण नागपुरातील जुने हायकोर्ट असल्याने बसपा नेत्यांनी जुन्या हायकोर्टाच्या प्रवेशद्वारावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना दिली. हायकोर्टाची परवानगी नसल्याचे व ही बिल्डिंग संरक्षित असल्याचे कारण सांगून आज त्या परिसरात जाण्यास मज्जाव करण्यात आला होता.

याबाबत बसपा नेते उत्तम शेवडे यांनी सविस्तर सांगितले की छत्तीसगड परिसरात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या सतनामी समाजात एक प्रसिद्ध संत बाबा मुक्तावनदास होते. त्यांचा सामाजिक व राजकीय दबदबा होता. राजकीय विरोधकांनी त्यांचा लहान भाऊ आगमनदास याला एका खोट्या गुन्ह्याच्या प्रकरणात अडकवून स्थानिक रायपूर कोर्टाकडून त्याला फाशीची सजा सुनावण्यात आली होती. सदर प्रकरण डॉ. बाबासाहेबांचे तत्कालीन सहकारी बाबू हरदास एल एन (कामठी) यांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांपर्यंत पोहोचले. डॉ. बाबासाहेबांनी सत्य परिस्थिती ऐकून आरोपींच्या बाजूने उभे राहिले व 29 एप्रिल 1937 रोजी नागपूरच्या जुन्या हायकोर्टातून त्यांना निर्दोष सोडविले.

यावेळी डॉ. बाबासाहेबांना पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने जनसमुदाय हायकोर्ट परिसरात जमला होता. यांना शांत करण्यासाठी एल एन हरदास यांनी उद्या कामठीत डॉ. बाबासाहेबांची जाहीर सभा घेण्याचे जाहीर करून अनुयायांना व जमावाला शांत केले. त्यानुसार 30 एप्रिल 1937 रोजी कामठीत डॉ. बाबासाहेबांची एक जाहीर सभा सुद्धा घेण्यात आली. यावेळी वादळ, वारा, पाऊस व विजेच्या कडकडाळातात ही सभा पार पडली. एल एन हरदास व आगमनदास हे दोघेही सीपी अँड बेरारच्या प्रांतिक कौन्सिलमध्ये निवडून आले होते. सी पी अँड बेरार (वऱ्हाड मध्यप्रांत) ची राजधानी नागपूर असून उच्च न्यायालय नागपूरच होते. त्या प्रकरणाच्या 89 व्या स्मृती निमित्ताने बसपा नेत्यांनी डॉ. बाबासाहेबांना त्या हायकोर्टाच्या प्रवेशद्वारावर मानवंदना दिली. मानवंदना देणाऱ्यात बसपाचे महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, ह्यूमन राईट प्रोटेक्शन फोर्सचे आशिष फुलझेले, नागपूर शहर बसपाचे महासचिव वैभव जामगडे, युवा नेते अंकित थूल, दिलीप लांडगे, शामराव तिरपुडे प्रामुख्याने उपस्थित होते. 1893 ला बांधण्यात आलेल्या या आलिशान बिल्डिंगमध्ये 1949 पर्यंत उच्च न्यायालय होते. भारत सरकारच्या आर्किऑलॉजी विभागाने 2018 पासून या बिल्डिंगला संरक्षित वास्तूचा दर्जा दिला. परंतु त्याची देखरेख होत नसल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वतः दखल घेऊन त्याकडे लक्ष वेधले. परंतु अजूनही त्या बिल्डिंगकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून आले. म्हणूनच बसपाला या परिसरात कार्यक्रम घेण्यास बंदी टाकण्यात आली. पुढील वर्षी याच ठिकाणी परवानगी व कायदा तज्ञांना सोबत घेऊन मोठा कार्यक्रम करण्याची घोषणा बसपा नेते उत्तम शेवडे यांनी यावेळी केली.

# 'युद्ध नको... बुद्ध हवा'

# नागपुरात धम्म रथयात्रेतून जागतिक शांततेचा निनाद

## हजारो अनुयायांकडून शांती आणि ऐक्याचा संदेश - ठिकठिकाणी पुष्पवृष्टी







**नागपूर :** बौद्ध पौर्णिमेच्या पावन निमित्ताने नागपुरात रविवारी भव्य 'विश्वशांती धम्म रथयात्रा' काढण्यात आली. नागपूर बुद्धिस्ट कन्सॉर्टियमच्या वतीने आयोजित या भव्य रथयात्रेने संपूर्ण शहरात शांती, सद्भाव आणि धम्माचा संदेश प्रसारित केला. या धम्म रथयात्रेत हजारो बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते. ठिकठिकाणी या यात्रेचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. भीम चौक जरिपटका येथून दुपारी या धम्मरथ यात्रेला सुरूवात झाली. धम्मरथ यात्रेमध्ये पंचशीलांच्या ध्वजासह हजारो बौद्ध अनुयायी चालत होते. रथावरील विविध देखावे आकर्षणाचे केंद्र ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्धांचे पुतळे, देशातील विविध बौद्ध स्थळ, स्तुप यासोबतच जगभरातील बौद्ध स्थळ आणि स्तुपांच्या देखाव्यांनी लक्ष वेधून घेतले. जगभरातील विविध बौद्ध राष्ट्रांचे राष्ट्रीय ध्वजाचा देखावाही विशेष आकर्षणाचे केंद्र ठरला. यावेळी संपूर्ण मार्गावर बौद्ध अनुयायांचा उत्साह पाहण्यासारखा होता. हजारो उपासक-उपासिका, भंते, तसेच विदेशातून आलेले भंते व अनुयायी या यात्रेत सहभागी झाले होते. बुद्ध आणि स्तूपांच्या प्रतिकृतींनी सजवलेले 14 आकर्षक धम्म रथ विशेष आकर्षण ठरले. याशिवाय स्तूपावर आधारित मुख्य रथ, लेझीम पथक, ढोल-ताशा पथक, साउंड सिस्टीम वाहने, विंटेज कार तसेच समता सैनिक दलाचे शिस्तबद्ध पथसंचलन यामुळे यात्रेची भव्यता अधिकच वाढली. 15 आंतरराष्ट्रीय ध्वजांसह निघालेली ही यात्रा जागतिक शांततेचे प्रतिक ठरली. ही धम्मरथ यात्रा इंदोरा चौक, कडबी चौक, सदर उड्डाणपूल, गड्डीगोदाम चौक, संविधान चौक, व्हेरायटी चौक, बोले पेट्रोल पंप, रविनगर चौक, रामनगर चौक, शंकरनगर चौक, काचीपुरा चौकमार्गे दीक्षाभूमीत पोहाचली. दीक्षाभूमीवर या धम्मरथ यात्रेचा समारोप झाला. या रथयात्रेचा मुख्य उद्देश समाजात धम्माच्या शांततापूर्ण विचारांचा प्रसार करणे, बौद्ध समाजातील ऐक्य बळकट करणे आणि स्तूप दर्शनाचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करणे हा होता. यात्रेच्या समारोपावेळी दीक्षाभूमी येथे सर्व अनुयायांनी एकत्र येऊन भगवान बुद्धांना मानवंदना व अभिवादन केले. यावेळी अश्विन गणवीर, नेहाल पाटील, अथांग कोरडे, राहुल डोंगरे, प्रवीण कांबळे, अश्विन गजभिये, राकेश धारगावे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, उपासक-उपासिका आणि विदेशी भंते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कंत्राटी कामगारांच्या हक्कासाठी आंदोलनाचा इशारा

**अकोला :** जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच वस्तीगृहांमध्ये कंत्राटी पद्धतीवर कार्यरत कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य विज निर्मिती रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष भाई जी. एम. भालेराव यांनी केला आहे.

भाई जी. एम. भालेराव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले की, कंपनी व कंत्राटदारांकडून कामगारांना शासनाने निर्धारित केलेले वेतन, वेतन स्लिप, पी.एफ., बोनस, किमान घरभाडे, वेळेवर पगार, साप्ताहिक सुट्टी, ई.एल., ईएसआयसी लाभ, सुरक्षितता साधने व ओळखपत्र यांसारख्या मूलभूत सुविधा दिल्या जात नाहीत. तसेच कामगारांवर मानसिक दबाव टाकून कोऱ्या कागदपत्रांवर जबरदस्तीने स्वाक्षऱ्या घेतल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. या संदर्भात संबंधित विभाग प्रमुखांनी पारदर्शक चौकशी करून दोषींवर कारवाई करणे अपेक्षित असताना, काही ठिकाणी कंपनी व कंत्राटदारांची पाठराखण होत असल्याचा गौप्यस्फोटही त्यांनी केला.

कामगारांच्या हक्कांसाठी व अन्यायाविरुद्ध लवकरच संवैधानिक मार्गाने आंदोलन उभारण्यात येणार असल्याचा इशारा भाई जी.एम. भालेराव यांनी दिला आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648